# प्रकरण १

**प्रास्ताविक :** ज्या अर्थी महाराष्ट्र राज्यातील वाणिज्य शिक्षण देणाऱ्या संस्थाचे अस्तित्वात असलेले नियम, निदेश, मान्यता आणि संस्थांचे संचालन यासंबंधात आवश्यक ते बदल व दुरुस्त्या करणे इष्ट आहे, त्या अर्थी शासन १९९१ च्या नियमावली मध्ये सुधारणा करून सुधारित नियम २०१४ तयार करीत आहे.

**संक्षिप्त नाव :** या नियमांना, महाराष्ट्र वाणिज्य विभाग शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन, पदविका आणि संगणक टायपिंग अभ्यासक्रम) मान्यता आणि संचालन नियम १९९१, सुधारित नियमावली, २०१४ असे म्हणता येईल.

**व्याप्ती :** हे नियम महाराष्ट्र राज्य आणि राज्याकडे हस्तांतरित होईपर्यंत.

**व्याख्या :** या नियमांत संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर

१) पाठ्यक्रम याचा अर्थ शासकीय वाणिज्य पदविका पाठ्यक्रम शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र पाठ्यक्रम आणि महाराष्ट्र शासनाकडुन वेळोवेळी अधिसूचित करण्यात येतील असे अन्य पाठ्यक्रम असा आहे.

२) विभाग याचा अर्थ शिक्षण विभाग (सामान्य शिक्षण) महाराष्ट्र राज्य असा आहे.

३) आयुक्त याचा अर्थ आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, महाराष्ट्र राज्य असा आहे.

४) विभागीय शिक्षण उपसंचालक याचा अर्थ संबंधित विभागाचा शिक्षण उपसंचालक, असा आहे.

५) शिक्षणाधिकारी याचा अर्थ संबंधित जिल्ह्याचा शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण) असा आहे.

६) परीक्षा याचा अर्थ, शासकीय वाणिज्य पदविका परीक्षा आणि शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे.

७) संस्था, याचा अर्थ या नियमान्वये रीतसर शासनमान्यता मिळालेली संस्था असा आहे.

८) प्राचार्य याचा अर्थ संस्थेचा प्रमुख म्हणुन सक्षम प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेला संस्थेच्या योग्य संचालनासाठी जबाबदार असलेला आणि संस्थेच्या प्रभारी म्हणुन नियुक्त करण्यात आलेला प्रमुख असा आहे.

९) व्यवस्थापन याचा अर्थ संस्थेवर सर्वसाधारण आणि आर्थिक नियंत्रण असलेली एखादी संघटना, मंडळ किंवा एखादी व्यक्ती असा आहे.

१०) सत्र याचा अर्थ शैक्षणिक प्रयोजनासाठी निश्चित केलेला कालावधी असा आहे.

**१०.१)** टंकलेखन, लघुलेखन व बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी/इंग्रजी/हिंदी ३० व ४० श.प्र.मि. करिता :

**पहिले सत्र:** याचा अर्थ १ जुलैपासुन सुरु होणारा आणि डिसेंबर अखेर संपणारा कालावधी असा आहे.

**दुसरे सत्रः** याचा अर्थ १ जानेवारीपासुन सुरु होणारा आणि जून अखेर संपणारा कालावधी असा आहे.

१०.२) स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर्स ॲन्ड स्टुडंटस् करिता :

**पहिले सत्रः** याचा अर्थ १ जुलै पासुन सुरु होणारा आणि सप्टेंबर अखेर संपणारा कालावधी असा आहे.

**दुसरे सत्रः** याचा अर्थ १ जानेवारी पासुन सुरु होणारा आणि मार्च अखेर संपणारा कालावधी असा आहे

११) सक्षम प्राधिकारी याचा अर्थ शिक्षण विभागाचे आणि नमुद केलेले अधिकारी असा आहे.

**अ) आयुक्त : आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद हा -**

१. निदेश काढण्याकरिता

२. नियमांची अर्थउकल करण्याकरिता सक्षम प्रधिकारी असेल.

३. विभागीय शिक्षण उपसंचालकाने घेतलेल्या निर्णयावरील सर्व अपिलांच्या बाबतीत अंतिम प्राधिकारी असेल.

४. या नियमांमध्ये अंतर्भुत नसलेल्या पण अन्य सर्व अनुषांगिक कारणांसाठी सक्षम प्राधिकारी असेल.

**ब) विभागीय शिक्षण उपसंचालक -**

संस्थांना मान्यता देणे, काढुन घेणे आणि रद्द करणे व आवश्यकतेनुसार तपासणी करणे याकरिता सक्षक प्राधिकारी असेल.

**क) शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण) -**

संस्थांची तपासणी करणे, मार्गदर्शन करणे आणि त्यांवर सर्वसाधारण नियंत्रण ठेवणे यासाठी सक्षम प्राधिकारी असेल.

१२) निदेशक याचा अर्थ व्यवस्थापनाकडुन निदेशक म्हणुन योग्यरित्या नेमलेली व्यक्ती असा आहे.